

एमडीआर रस्त्याविरोधात मांद्रे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



आशिया कपमध्ये खेळणार भारत ? » पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, २० मे २०२५ । पाने ४ । ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 257 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 20 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### आशियात कोरोनाचा जेएन१ व्हेरिएंट पसरण्यास सुरुवात

**आशिया, दि. १९ :** आशियातील अनेक देशांमध्ये कोरोना विषाणूचे रुग्ण पुन्हा वाढत आहेत. सिंगापूर, हाँगकाँग, चीन आणि थायलंडसारख्या देशांमध्ये नवीन रुग्णांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. यावेळी ओमिक्रॉनचा नवीन प्रकार युएन १ आणि त्याचे उप-प्रकार एलएफ ७ आणि एनबी१.८ या संसर्गासाठी जबाबदार आहेत. मे महिन्याच्या सुरुवातीला सिंगापूरमध्ये १४ हजारहून अधिक रुग्णांची नोंद झाली आहे. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात ही संख्या सुमारे ११ हजार १०० होती. येथे रुग्णांमध्ये २८ टक्के वाढ झाली आहे. त्याच वेळी, दररोज रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या ३० टक्क्यांनी वाढली आहे.

------------------

### बंगळूरूमध्ये तब्बल ४ इंच पाऊस

**बंगळुरू, दि. १९ :** रविवारी बेंगळुरूमध्ये मुसळधार पाऊस पडला. तब्बल ११० मिमी पेक्षा जास्त पावसाने रस्ते आणि घरे पाण्याखाली गेली. अनेक भागात वाहने पाण्याखाली गेली आणि लोकांना तुंबलेल्या पाण्यातून बाहेर काढावे लागले. बेंगळुरूच्या महादेवपुरा भागात भिंत कोसळल्याने एका ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. बचाव पथकाने सांगितले की, काल रात्री झालेल्या मुसळधार पावसानंतर भिंतीचा पाया कमकुवत झाला, ज्यामुळे ही दुर्घटना घडली. हवामान खात्याने (१९ मे) आणि उद्या बेंगळुरूमध्ये मुसळधार पावसासाठी यलो अलर्ट जारी केला आहे. या काळात ५० ते ६० किमी प्रति तास वेगाने वारे देखील वाहू शकतात.

# ऑपरेशन सिंदूरपूर्वी पाकिस्तानला सूचित केले गेले?

**नवी दिल्ली, दि. १९ :**

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाम (२२ एप्रिल) दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ६-७ मेच्या मध्यरात्री अंमलात आणलेल्या ऑपरेशन सिंदूर संदर्भात परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी हल्ल्यापूर्वी पाकिस्तानला संदेश पाठवला असे म्हटल्याचे व्हिडिओ पसरल्यानंतर राजकीय वर्तुळात तीव्र वादंग उसळला आहे. काँग्रेसने या विधानावरून मोदी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत.**

सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेसचे मुख्य प्रवक्तेपवन खेड़ा म्हणाले की, डॉ. जयशंकर यांनी स्वतः वृत्तसंस्थांना सांगितले की कारवाईपूर्वी पाकिस्तानला माहिती दिली. दहशतवाद्यांच्या आदेशावर ते शांत बसतील, अशी परराष्ट्रमंत्र्यांना खात्री होती का?

खेडा यांनी पुढे विचारले की, कंधार अपहरणानंतर मसूद अझहर सुटला; आता पाकला आगाऊ इशारा दिल्यामुळे तो आणि हाफिज सईद सुटून गेला असावा, ही शक्यता देशाला कशी ग्राह्य धरू नये?




विरोधी पक्षनेते राहुल गांध यांनीही सोशल मीडियावर, हे चूक नव्हे, गुन्हा आहे; हवाई दलाला यामुळे किती विमाने गमवावी लागली? असा सवाल उपस्थित करत परराष्ट्रमंत्र्यांकडून सविस्तर निवेदन मागितले.पीआयबी फॅक्ट चेक युनिटने ट्विटद्वारे स्पष्ट केले की, परराष्ट्रमंत्र्यांच्या विधानाचा संदर्भ विपर्यासित करण्यात आला आहे; याआधीही आम्ही अशा दाव्यांना खोटे ठरवले आहे.

भाजप प्रवक्ते सी. आर. केशवन यांनी काँग्रेसवर दिशाभूल करणारे व धोकादायक ट्वीट केल्याचा आरोप केला. तर पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला म्हणाले की, काँग्रेस हा बनावट बातम्यांचा कारखाना आहे; पाकिस्तान या अपप्रचाराचा फायदा उठवू शकतो.

अण्वस्त्रधारी देशांमध्ये चूकवाचूक टाळण्यासाठी ऑपरेशन सुरू होताच संपर्क साधण्याची राजनैतिक प्रथा आहे. खूप आधी' सूचना देण्याचा प्रश्न येत नाही असे माजी परराष्ट्र सचिवांचे मत आहे . संरक्षण विश्लेषक कमर आगा यांच्या मते, विरोधकांचे प्रश्न राजकीय स्वाभाविक आहेत; मात्र माहिती युद्धात वेळेसंदर्भ महत्त्वाचा असतो. सरकारने अधिक तपशील मांडल्यास वाद निवळू शकतो.

काँग्रेसने या मुद्द्यावर संसदेच्या विशेष बैठकीची मागणी केली आहे. दरम्यान, परराष्ट्र मंत्रालय वा पंतप्रधान कार्यालयाने जयशंकर यांच्या संदेश'चा अचूक कालावधी, स्वरूप व उद्देशलसार्वजनिक करावा, अशी मागणी तज्ज्ञ व विरोधक करत आहेत. सरकारकडून अद्याप औपचारिक विस्तृत स्पष्टीकरण आलेले नाही.

राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळात दहशतवादाशी लढण्यासाठी आवश्यक असलेली राष्ट्रीय एकजूट टिकवण्यासाठी दोन्ही बाजूंनी पारदर्शकता आणि संयम अवलंबणे गरजेचे असल्याचे सुरक्षा विश्लेषकांचे मत आहे.

# मुख्यमंत्र्यांनी घेतला मान्सून तयारीचा आढावा

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १९ :** राज्यभरात पावसाळा जवळ आल्याने मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी पर्वरी येथील मंत्रालयात राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगामी मान्सून काळात संभाव्य आपत्कालीन परिस्थितींचा सामना करण्यासाठी राज्य प्रशासनाची तयारी कशी आहे, याचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की , राज्यातील भूस्खलन आणि पूरप्रवण क्षेत्रांची यादी तयार करण्यात आली आहे. संबंधित विभागांना पूर्वतयारीसाठी निर्देश देण्यात आले असून आवश्यक निधीही मंजूर करण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्यातील सर्व उपजिल्हाधिकाऱ्यांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सुरुवातीस प्रत्येकी ५ लाख निधी वितरित करण्यात आला आहे. गरज भासल्यास हा निधी वाढविण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, उपजिल्हाधिकारी कार्यालये आणि संबंधित लाइन विभागांनी २४ तास कार्यरत राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री सावंत यांनी ' एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करताना म्हटले आहे की, प्रत्येक विभागाने मान्सून दरम्यान निर्माण होणाऱ्या अडचणींवर तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी एक समर्पित नोडल अधिकारी नेमावा, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना देखील पावसाळ्यापूर्व तयारीसाठी निधी वितरित करण्यात आला असून, ग्रामपंचायतींना ३५ हजार , ब' श्रेणी नगरपालिकांना ६० हजार आणि अ' श्रेणी नगरपालिकांना १ लाख १० हजार निधी मंजूर करण्यात आल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

सावंत यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला जीर्ण व धोकादायक इमारती ओळखून त्वरित पाडाव्यात, अशी सूचना केली असून, जलसंपदा विभागाला पुराचा धोका टाळण्यासाठी नद्यांमधून गाळ काढण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी कोणत्याही आकस्मिक परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आवश्यक यंत्रणा सज्ज ठेवाव्यात. संभाव्य नुकसानीची तीव्रता कमी करण्यावर आमचा भर आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.राज्यात पावसाळ्यादरम्यान नागरिकांचे जीवन सुरळीत व सुरक्षित राहावे, यासाठी गोवा सरकार पूर्णतः कटिबद्ध आहे,असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

# दुचाकीस्वाराच्या धडकेत महिलेचा मृत्यू; पती व मुलगी गंभीर जखमी

*■ टीम दैनिक हेराल्ड*

**कासावली, दि. १९ :** येथील थ्री किंग्ज हॉलजवळ रविवारी रात्री उशिरा एका बेदरकार दुचाकीस्वाराने पादचाऱ्यांना धडक दिल्याने एका महिलेचा मृत्यू झाला असून तिचे पती व अल्पवयीन मुलगी गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर सध्या मडगावच्या दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरोडा येथील आर्यन गावडे हे वेर्णा येथे जात असताना कासावली मार्केटजवळील थ्री किंग्ज हॉलजवळ त्यांनी निष्काळजीपणे दुचाकी चालवत रस्त्याच्या कडेला पायी जाणाऱ्या तिघांवर जोरदार धडक दिली. या अपघातात उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथील संगीता बिंद (वय अंदाजे ४०) यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचे पती सेराई बिंद आणि १३ वर्षांची मुलगी गंभीर जखमी असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघातात दुचाकीस्वार आर्यन गावडे व त्याच्या मागे बसलेला युवकही जखमी झाले आहेत. गावडे यांना पुढील उपचारांसाठी बांबोळी येथील गोवा वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

वेर्णा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. शवविच्छेदन अहवालानुसार, छाती, पोट व मणक्याला बसलेल्या जोरदार आघातांमुळे संगीता बिंद यांचा मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या प्रकरणी वेर्णा पोलिसांनी भारतीय न्याय संहिता पान २ ▶

